प्रेस नोट

दि. २५/१०/२०१८

# आंबोली घाटात ट्रक क्लीनरचा खुन करणाऱ्या आरोपींचा पर्दाफाश

आंबोली घाटात दि. १५/१०/२०१८ रोजी एक बेवारस ट्रक मिळुन आलेला होता. सदर ट्रकमधे एक अनोळखी इसमाचा गळा दाबुन तसेच डोक्यावर टॉमी मारून खुन करून प्रेत पोत्यात भरुन ट्रक चे केबीन मध्ये ठेवुन ट्रक मधील सुमारे १० लाख रु. किमतीची साखरेची पोती चोरुन नेलेली होती. सदर घटनेची माहिती प्राप्त होताच त्याबाबत सावंतवाडी पोलीस ठाणेत गुन्हा रजि.नं. १८३/२०१८ भादंवि कलम ३९४,३०२,२०१ अन्वये गुन्हा दाखल करून सदर गुन्हयाचा तपास सुरु करण्यात आलेला होता. सदर गुन्हयातील आरोपीत यांचा लवकरात शोध घेण्याबाबत मा. पोलीस अधीक्षक श्री. दिक्षीतकुमार गेडाम तसेच अपर पोलीस अधीक्षक श्री. निमित गोयल यांनी स्थानिक गुन्हे अन्वेषण यांना सुचना देवुन गुन्हा लवकरात लवकर उघडकीस आणण्याबाबत आदेश देण्यात आलेले होते.

त्यानुसार तपासामध्ये खुन झालेल्या मयताचे नाव रजनिकांत महिपतराव माने वय-३७ रा. खानापुर असे नाव निष्पन्न झाले. गुन्हयातील आरोपीत यांचा शोध घेण्याकरीता स्थानिक गुन्हे अन्वेषण तसेच सावंतवाडी पोलीस ठाणे यांचेकडील विशेष पथके तयार करण्यात आलेली होती. सदर पथकांकरवी आंबोली, कोल्हापुर, बेळगाव, कर्नाटक येथे जावुन संशयीत यांचा शोध घेण्यात आला. रेकॉर्डवरील गुन्हेगार, तसेच अशाच प्रकारचे गुन्हे कारणारे सराईत गुन्हेगार तसेच टोळी व इतर राज्यातील तसेच जिल्हयातील रेकॉर्डवरील आरोपीत यांना पडताळण्यात आलेले होते. त्यानुसार कोल्हापुर येथील राजारामपुरी पोलीस ठाणे हद्दीमध्ये साखरेची पोती चोरी झाल्याची चर्चा सुरु असल्याबाबत स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागास मिळाली. त्यानुसार दि. २४/१०/२०१८ रोजी स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पथक राजारामपुरी, कोल्हापुर येथे जावुन स्थानिक पोलीस ठाणेची मदत घेवुन कोल्हापुर येथील ६ आरोपीत व बेळगाव येथील ज्या ठिकाणी चोरीची साखर उतरवण्यात आलली होती. ते व्यापारी यांना तात्काळ ताब्यात घेण्यात आले. त्यांना सदर गुन्हयाचे कामी अटक करण्यात आलेले आहे. साखरेच्या पोती हस्तगत करण्याचे तसेच यामध्ये अजुन कोणी आरोपीत आहेत अगर कसे याबाबत तपास सुरु आहे. आज रोजी सर्व आरोपीत यांना मा.न्यायालयात हजर करण्यात येणार आहे.

सदर पथकामध्ये मा. पोलीस अधीक्षक श्री. दिक्षीतकुमार गेडाम, अपर पोलीस अधीक्षक श्री. निमित गोयल, उपविभागीय पोलीस अधिकारी, सावंतवाडी, श्री. शिवाजी मुळीक, पोलीस उपअधीक्षक श्रीमती/ फडतरे तसेच स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक, श्री. प्रल्हाद पाटील, सावंतवाडी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी श्री. सुनील धनावडे, पोलीस उपनिरीक्षक श्री. रविराज फडणीस, सपोफौ/ सुभाष खंदारे, पोहेकॉ/ सुधीर सावंत, पोहेकॉ/ प्रसाद सावंत, पोहेकॉ/ गुरुनाथ कोयंडे, पोना/संतोष सावंत,पोना/ सदानंद राणे, पोना/ अनुप खंडे, पोकॉ/ संकेत खाडये, पोकॉ/रवि इंगळे, पोकॉ/अमित तेली, मपोकॉ/ आरती भोसले यांचा समावेश होता.

धन्यवाद,

दिक्षीतकुमार गेडाम

पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग.